# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 189/2022 दिनांक : 07.05.2022**

## 1)घरफोडी :–

**1)अर्धापुर :–** दिनांक 06.05.2022 रोजी 02.50 वा. ते 03.20 वा. चे दरम्यान, **गॅस पंप खडखुत पाटीजवळ पिंपळगाव शिवार ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी गॅस पंपावर दिवसभर जमा झालेली रक्कम 45,000/– रुपये काउंटर मध्ये ठेवुन पंपावरील दोन कर्मचारी झोपण्यासाठी ठेवले असता खिडकीचे काच ढकलुन खिडकी उघडुन आत प्रवेश करुन ऑफीस मधील पैसे ठेवण्याचे काउंटर उचलुन बाहेर नेवुन त्याचे कलूप तोडुन त्यातील नगदी 45,000/– रुपयाचे यातील नमुद चोरटयाने चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी त्र्यंबक मुरलीधरराव कुलकर्णी, वय 54 वर्षे, व्यवसाय गॅसपंप रा. अशोकनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 112/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/797 खरबे, मो.क्र. 9421766039** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :–** दिनांक 05.05.2022 रोजी 13.00 वा. चे सुमारास, **गणराज नगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे त्यांचे घराला कुलुप लावुन दुकानावर गेले असता घराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करुन लोखंडी कपाटाचे लॉक तोडुन कपाटातील व्यापाराचे नगदी 3,98,000/– रुपयाचे अज्ञात चोरटयाने चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी कानाराम अमृतराव चौरी, वय 24 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. गणराज नगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 153/2022 कलम 454,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री मंठाळे, मो.क्र. 8237703777** हे करीत आहेत.

**3)शिवाजीनगर :–** दिनांक 06.05.2022 रोजी 14.00 वा. चे सुमारास, **टावून मार्केट सोसायटी, हिंगोली गेट, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे देवदर्शनासाठी शेगाव येथे गेला असता कोणीतरी अज्ञात चोरटयानी बंद घराचे कडी कोंडा कुलुप तोडुन सोन्या चांदीचे दागीने व नगदी एकुण 1,14,,000/– रुपयाचा ऐवज अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी सुमित सुधाकरराव गुंडावार, वय 30 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. टावून मार्केट सोसायटी हिंगोली गेट, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 178/2022 कलम 454,457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री रोडे, मो.क्र. 9158807759** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**1)शिवाजीनगर :–** दिनांक 03.05.2022 रोजी 23.00 वा. चे सुमारास, **स्टेडीअम नांदेड चे मेन कमान येथे,** यातील फिर्यादीची हिरो कंपनीची स्पेलंडर प्लस काळया रंगाची मो.सा. क्रं. एमएच–26/बीएन–3490 किमती 40,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी बाबाराव शंकरराव फुलारी, वय 24 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. गोविंदनगर तरोडा बु. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 175/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री शिंदे, मो.क्र. 9579308012** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**शिवाजीनगर :–**दिनांक 05.05.2022 रोजी 21.30 वा. चे सुमारास, **नविन मोंढा, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हि संत निरंकारी माता यांचे नविन मोंढा येथील प्रवचन संपल्या नंतर पाणी कॅन जवळ पाणी घेण्यासाठी गेले असता गर्दीचा फायदा घेवून फिर्यादीची नजर चुकून फिर्यादीचे गळयातील 22 ग्रॅम सोन्याची चैन किंमती 60,000/–रूपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी गंगामती रामलु मोटाला, वय 60 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. आनंदनगर फॉरेस्ट ऑफिस समोर निजामाबाद टी.एस.** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 177/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री रोडे, मो.क्र. 9158807759** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**1)भाग्यनगर :–**दिनांक 05.05.2022 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **शिवसाई नगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीस यातिल नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन लाथाबुक्याने मारहाण केली व फिर्यादीचे पत्नीस लोखंडी रॉडने डोक्यात मारुन गंभीर दुखापत केली व लोखंडी गजाळीने पाठीवर मारुन जीवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी भागवत लक्ष्मणराव भुजबळ, वय 44 वर्षे, व्यवसाय शेती रा. शिवसाई नगर, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 159/2022 कलम 326,323,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री कांबळे, मो. नं. 9890630130** हे करीत आहेत.

**2)बारड :–** दिनांक 30.04.2022 रोजी चे 16.00 वा. चे सुमारास, **ग्रामपंचायत कार्यालय बारड समोर बाजाराचे मोकळया मैदानात, ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी डीजे बॉक्सवर चढुन भिम जयंती मिरवणुक दरम्यान यातील नमुद आरोपीच्या हातातील झेंडा घेवून फडकावत असताना नमुद आरोपीने फिर्यादीस हातातील झेंडा घेवुन फडकावण्याचे कारणावरुन त्यांचे सोबत झटापटी करुन हयगय व निष्काळजीपणे ढकलुन दिल्याने जमिनीवर पडल्यामुळे फिर्यादीचे खांद्यावर हाड मोडुन जबर दुखापत होण्यास कारणीभुत झाला आहे. वगैरे **फिर्यादी संदेश माधव आठवले, वय 28 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. ज्ञानदिपनगर बारड, ता. मुदखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरन 37/2022 कलम 325,323 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री वानोळे, मो. नं. 8208506753** हे करीत आहेत.

## 5)फसवणुक :–

**हिमायतनगर :–** दिनांक 05.05.2022 रोजी 12.45 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहते घरी हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घरी जावुन तुम्हाला लॉटरीवर स्कुटी लागली आहे. त्यासाठी तुम्हाला तुमच्याकडील सोने सोनाराकडे वजन करुन घेण्यासाठी सोनाराकडे घेवून जावे लागेल असे म्हणुन फिर्यादी जवळील साडेसोळा ग्रॅम सोन्याचे गंठन,दहा ग्रॅम सोन्याचे एक ऐड, नार्जो कंपनीचा मोबाईल असा एकुण 1,56,999/–रुपयाचा ऐवज दिशाभुल करुन पोबारा केला व फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी विष्णु राजाराम उत्तरवार, वय 55 वर्षे, रा. व्यवसाय मजुरी रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरन 100/2022 कलम 420 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2303 सिंगनवाड मो. नं. 9049075521** हे करीत आहेत.

## 6)अपघात :–

**1)सोनखेड :–** दिनांक 04.05.2022 रोजी 14.00 वा. चे सुमारास, **नांदेड ते लोहा रोडवर जानापुरी कॅम्प जवळ ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे वडील **मयत नामे धोंडीबा लक्ष्मण केंद्रे वय 65 वर्षे, रा. नंदकिशोरनगर पुर्णा रोड, नांदेड** हे त्यांचा मालकीचा मालवाहु **टाटा एस क्र. एमएच/26–एडी–8115 व चालक मयत नामे राम लक्ष्मण चिंतलवाड वय 38 वर्षे रा. घुंगराळा ता. नायगाव जि. नांदेड** असे नांदेड कडे जात असताना बस क्रं. केए/38–एफ–1021 च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन बस हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन मयत यांचे टाटा एस ला समोरा समोर जोराची धडक दिल्याने गंभीर मार लागुन मरण पावले. वगैरे **फिर्यादी कैलास धोंडीबा केंद्रे वय 29 वर्षे व्यवसाय वाहन चालक रा. नंदकिशोरनगर पुर्णा रोड, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं. 78/2022 कलम 279,304(अ) भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री भोसले, मो.क्र. 9960157059** हे करीत आहेत.

**2)लोहा :–** दिनांक 30.04.2022 रोजी 06.15 वा. चे सुमारास, **धावरी फाटा येथे कंधार ते लोहा जाणाऱ्या रोडवर ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा नातु **मयत नामे बस्वराज शिवराज सोनवळे वय 23 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. शिवाजी चौक लोहा, ता. लोहा जि. नांदेड** हा मॉर्निंग वॉक करुन घराकडे परत येत असताना हायवा टिप्पर **क्र. एमएच/26–एजी–8427** च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हायवा टिप्पर हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन मयत हा साईडने पायी येत असताना पाठीमागुन जोराची धडक दिल्याने गंभीर मार लागुन मरण पावला. वगैरे **फिर्यादी दिगंबर रामचंद्र सोनवळे वय 68 वर्षे व्यवसाय शेती रा. शिवाजी चौक लोहा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं. 100/2022 कलम 279,337,338,304(अ) भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री सोनकांबळे, मो.क्र. 9850188100** हे करीत आहेत.

## 7)भारतीय हत्यार कायदा :–

**1)वजिराबाद :–** दिनांक 06.05.2022 रोजी 15.30 वा. चे सुमारास, **गुरुव्दारा गेट नं. 4 समोर बडपुरा, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशीर रित्या एक धारदार शस्त्र तलवार किमत अं. 1000/– ची स्वतःचे ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1098 विजयकुमार कुरमय्या नंदे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं. 154/2022 कलम कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/452 उतकर, मो.क्र. 02462236500** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :–** दिनांक 05.05.2022 रोजी 21.30 वा. चे सुमारास, **भगतसिंग रोड अबचल कमानी समोर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशीर रित्या एक धारदार शस्त्र तलवार किमत अं. 1000/– ची स्वतःचे ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1098 विजयकुमार कुरमय्या नंदे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं. 151/2022 कलम कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/452 उतकर, मो.क्र. 02462236500** हे करीत आहेत.

## 8)जुगार :-

**मनाठा :-** दिनांक 05.05.2022 रोजी चे 19.00 वा. सुमारास, **मौजे निमगाव शिवारात हारी धनु राठोड यांच्या शेतामध्ये लिंबाच्या झाडाखाली मोकळया जागेत ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2500/-रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोह/2111, ने. पोस्टे मनाठा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं 86/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2111 तिडके, मो.क्र. 9767242111** हे करीत आहेत.

## 9)पाण्यात बडुन मृत्यु :-

**नांदेड ग्रामीण :-**दिनांक 05.05.2022 रोजी चे 18.55 वा. चे पुर्वी, **गोदावरी नदीचे पात्रात काळेश्वर विष्णुपुरी, नांदेड येथे,** यातील **मयत नामे साईनाथ विश्वनाथ इंगाले, वय 17** वर्षे, **रा. पाटील गल्ली कळमनुरी ता. कळमनुरी जि. हिंगोली**, हा गोदावरी नदीचे पात्रात मित्रांसोबत पोहण्यासाठी गेला असता तो पाण्यात बुडुन मरण पावला. वगैरे **खबर देणार श्रीकांत गणेशराव काकडे, वय 34** वर्षे, **व्यवसाय व्यापार रा. मगनपुरा नवा मोंढा, नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** आ. मृ. **55**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/124 गवळी, मो.नं. 8208681527** हे करीत आहेत.

## 10)विषारी औषध पिवून आत्महत्या :-

**उमरी :-**दिनांक 26.04.2022 रोजी चे 22.00 वा. सुमारास, **विष्णुपुरी, नांदेड येथे,** यातील **मयत नामे कृष्णा तानाजी कदम, वय 18 वर्षे, रा. बिनेगाव ह.मु. उमरी ता. उमरी जि. नांदेड**, याने कोणतेतरी विषारी औषध पिल्याने त्यास स.द. नांदेड येथे उपचारा साठी दाखल केले असता मरण पावला. वगैरे **खबर देणार पोह/2715 एम.के. गोटमवाड, ने. पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे उमरी** आ. मृ. **18**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1661 कदम, मो.नं. 9623658510** हे करीत आहेत.

## 11)गळफास घेवुन मृत्यु :-

**रामतीर्थ :-**दिनांक 06.05.2022 रोजी 20.00 वा. चे सुमारास, **रामतीर्थ मयताचे शेतात, ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे श्रीनिवास गोविंदराव रोकडे, वय 27 वर्षे, रा. रामतीर्थ ता. बिलोली जि. नांदेड**, यांनी स्वतःचे शेतात लिंबाचे झाडाला गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार खुशालराव मारोतराव रोकडे, वय 54 वर्षे, व्यवसाय पोलीस पाटील रामतीर्थ रा. रामतीर्थ ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे रामतीर्थ** आ. मृ. **13**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री इंगळे, मो.नं. 9764902710** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड